**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार दिनांक ०५ फेब्रुवारी २०२५**

**ठळक बातम्या**

1. **'ॲडव्हान्टेज विदर्भ २०२५-खासदार औद्योगिक महोत्सव' ७ फेब्रुवारी रोजी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन.**
2. **शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठीशिक्षण, तंत्रज्ञान, संशोधनाचा वापर करा- अकोल्याच्या डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या ३९ वा दीक्षांत समारंभ राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांचे प्रतिपादन.**
3. **शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी आज नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर इथं नगर परिषद प्राथमिक आणि माध्यमिक शाळेला भेट देवून केली पाहणी.**
4. **आता तीन लाखापेक्षा जास्त रक्कमेची विकास कामे ई-निविदा प्रक्रियेव्दारे-नागपूर मनपा आयुक्त आणि प्रशासक डॉ.अभिजित चौधरी यांचे निर्देश.**
5. **दक्षिण पूर्व मध्य रेल्वेतर्फे नागपूरहून प्रयागराज महाकुंभासाठी विशेष रेल्वे सुविधा.**

---

**'ॲडव्हांटेज विदर्भ २०२५**

**विदर्भाच्या मेगा इंडस्ट्रियल एक्स्पो, बिझनेस कॉन्क्लेव्ह आणि इन्व्हेस्टमेंट समिट 'ॲडव्हान्टेज विदर्भ २०२५ - खासदार औद्योगिक महोत्सव' चे शुक्रवार, ७ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन होत आहे.केंद्रीय मंत्री आणि मुख्य संरक्षक नितीन गडकरी यांच्या संकल्पेनतून साकारलेल्या व असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट द्वारे आयोजित ॲडव्हांटेज विदर्भ 2025 राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ परिसर, अंबाझरी मार्ग, नागपूर येथे 7 ते 9 फेब्रुवारी दरम्यान आयोजित करण्यात आला आहे. उद्घाटन सत्राला महसूल मंत्री आणि नागपूरचे**

पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे; उद्योग मंत्री उदय सामंत, केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. या औद्योगिक प्रदर्शनात विविध उत्पादने आणि बहु-क्षेत्रीय उद्योगांचे ३०० हून अधिक स्टॉल राहणार आहेत. त्यापैकी १०० स्टॉल सूक्ष्म आणि लघु उद्योगांसाठी राखीव ठेवण्यात आले आहेत.

-------------------------------------

अकोला दीक्षांत सोहळा

कृषी पदवीधरांनी शिक्षण, तंत्रज्ञान, संशोधन यांचा वापर शेतक-यांचे जीवनमान उंचावण्यासाठी आणि शेती क्षेत्राच्या प्रगतीसाठी करावा, असे प्रतिपादन विद्यापीठ कुलपती तथा राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनी आज अकोल्यात केलं. डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या ३९ वा दीक्षांत समारंभ राज्यपालांच्या उपस्थितीत झाला, त्यावेळी ते बोलत होते. प्रतिकुलपती तथा राज्याचे कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, कामगार मंत्री तथा जिल्हयाचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर, कुलगुरू डॉ. शरद गडाख, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. समारंभात विविध विद्याशाखांच्या एकूण ४ हजार ४० स्नातकांना विविध पदव्या प्रदान करण्यात आल्या. राज्यपाल राधाकृष्णन म्हणाले की, ज्ञान मिळवणे ही सातत्यपूर्ण प्रक्रिया आहे. देशाच्या कृषी क्षेत्राला अधिकाधिक प्रगत करण्याची जबाबदारी नवपदवीधरांना पार पाडायची आहे. महाराष्ट्रात कृषी आणि औद्योगिक विकास होत असल्यास याकडे त्यांनी लक्ष वेधले -----

*This is the only state where the industrial development is of immense importance as well as the agriculture development is of immense importance so both the things have been so both the things have been taken care that is the greatness of our Maharashtra state and I am very proud of it.*

डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाने बीजनिर्मिती, पशुधन विकास, आदर्श ग्राम प्रकल्प अशा उपक्रमांबरोबरच नवनव्या अभ्यासक्रमातून अनेक विद्याशाखांचा विकास केला आहे. ते पुढे म्हणाले की, ज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील भारताची झेप जगभरात देदिप्यमान ठरली आहे. विद्यार्थ्यांनी ज्ञानप्राप्ती, त्याचे उपयोजन व करावयाचे कार्य याबाबत निश्चित ध्येय ठरवून त्यानुसार वाटचाल

करावी, असं ते म्हणाले. यावेळी २५ स्नातकांना कृषी, उद्यानविद्या, कृषी अभियांत्रिकी आदी विषयांतील पीएच.डी प्रदान आली.

--------------------------------------

दादा भुसे

शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी आज नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर इथं नगर परिषद प्राथमिक आणि माध्यमिक शाळेला भेट देवून पाहणी केली. पाचव्या वर्गात जाऊन त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत पुस्तक वाचन घेतले. तसेच कळमेश्वर तालुक्यातील उबाळी गावातील शाळेला भेट देवून पाहणी केली. कशिश ठाकूर या तिसरीतील विद्यार्थिनीने त्यांना कविता गाऊन दाखविली.

--------------------------------------

फोल्डिंग हेल्मेट

दुचाकी स्वारांसाठी उपयुक्त ठरेल, असे फोल्डिंग हेल्मेट राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील संशोधकांनी तयार केले आहे. दोघांचीही हेल्मेट दुचाकीमध्ये ठेवता येणारे नाविन्यपूर्ण संशोधन भौतिकशास्त्र विभागातील वरिष्ठ प्राध्यापक डॉ.संजय ढोबळे व एमएससीची विद्यार्थिनी आदिती देशमुख यांनी केले आहे. या संशोधनाच्या उपयुक्तेबद्दल आकाशवाणीसोबत डॉ.ढोबळे यांनी संवाद साधला.....

*हे हेल्मेट लोकांकरता फार उपयोगी राहील आणि आरटीओ नी आपल्यावर जे नियम लावले आहेत त्याकरता त्यांना पण मदत मिळेल आपण सरकार ला मदत केली पाहिजे आपली सुरक्षा केली पाहिजे हीच आमची इच्छा आहे.*

मनपा

नागपूर महानगरपालिकेच्या निधी अंतर्गतची तसेच शासन निधी अंतर्गतची तीन लक्ष रुपयांपर्यंतची कामे ऑफलाईन निविदा पध्दतीने आणि तीन लक्षपेक्षा जास्त रक्कमेची विकास कामे ई-निविदा प्रक्रियेव्दारे राबविण्याचे निर्देश मनपा आयुक्त आणि प्रशासक डॉ.अभिजित चौधरी यांनी प्रशासनाला दिले आहेत. निविदा प्रक्रियेमध्ये पारदर्शकता यावी आणि स्पर्धात्मक निविदेमुळे महानगरपालिकेची आर्थिक बचत व्हावी, या हेतूने मनपाद्वारे सदर निर्णय घेण्यात आलेला आहे. या निर्णयामुळे ऑनलाईन निविदा प्रक्रियेमध्ये पारदर्शकता येईल तसेच स्पर्धात्मक निविदेमुळे महानगरपालिकेची आर्थिक बचत होईल. ई-निविदा प्रक्रिया टाळण्याकरिता कोणत्याही प्रकारे कामाचे विभाजन आणि तुकडे करण्यात येउ नये याबाबत खबरदारी घ्यावी, अशी सूचना मनपा आयुक्त तथा प्रशासक

डॉ.अभिजित चौधरी यांनी सर्व विभाग प्रमुख आणि सर्व झोनचे सहायक आयुक्तांना केली आहे.

-------------------------------------

## दक्षिण पूर्व मध्य रेलवे

दक्षिण पूर्व मध्य रेलवेतर्फे नागपूरहून प्रयागराज महाकुंभासाठी विशेष रेल्वे सुविधा सुरु करण्यात आली आहे. या संदर्भात, महाकुंभमेळ्यानिमित्त गाड्यांमध्ये होणाऱ्या अतिरिक्त गर्दीच्या वेळी रेल्वे प्रवाशांना जास्तीत जास्त निश्चित बर्थ/सीट्स उपलब्ध करून देता याव्यात यासाठी दक्षिण पूर्व मध्य रेलवे नागपूर विभागाकडून विशेष गाड्या चालवल्या जात आहेत. ट्रेन क्रमांक: ०८८६३/०८८६४ इतवारी-टुंडला-इतवारी कुंभ स्पेशल गाडी ७ फेब्रुवारी २०२५ रोजी इतवारी येथून सकाळी ८:१५ वाजता निघेल. भंडारा रोड, तुमसर रोड, गोंदिया, बालाघाट, नैनपूर-जबलपूर मार्गे हि गाडी पोहचेल. ट्रेन क्रमांक: ०८७५३/०८७५४ रायपूर-टुंडला-रायपूर कुंभ स्पेशल ही ट्रेन ९ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ७:१५ वाजता रायपूरहून निघेल आणि १० फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता टुंडला पोहोचेल ही गाडी राजनांदगाव, डोंगरगड, गोंदिया, बालाघाट, नैनपूर-जबलपूर मार्गे जाईल. ट्रेन क्रमांक: ०८२५३/०८२५४ बिलासपूर-वाराणसी-बिलासपूर कुंभ स्पेशल गाडी २२ फेब्रुवारी २०२५ रोजी बिलासपूरहून सकाळी ८:१५ वाजता निघेल आणि २३ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता वाराणसीला पोहोचेल. गाडी राजनांदगाव, गोंदिया, बालाघाट, नैनपूर-जबलपूर इथं थांबे घेईल.

-------------------------------------

## हवामान

विदर्भात आज सर्वात कमी किमान तापमान भंडारा इथं 17 अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं, तर सर्वाधिक कमाल तापमान अकोला इथं 37 अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं. नागपुरात आज किमान 18 अंश सेल्सिअस तर कमाल 35. 6 अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली.

-------------------------------------

## विदर्भ इंडस्ट्रीज असोसिएशन

विदर्भ इंडस्ट्रीज असोसिएशन टॅक्सेशन अँड कॉर्पोरेट लॉ फोरमतर्फे काल संध्याकाळी VIA उद्योग भवन सिविल लाईन्स इथं Post Budget Analysis या विषयावर एक सत्र आयोजित करण्यात आलं, यावेळी चार्टर्ड अकाउंटंट नरेश

यांनी प्रस्तावित वित्तीय विधेयक 2025 मधल्या सुधारणांच्या परिणाम बद्‌दल चर्चा केली. मध्यमवर्गीयांना कर सवलतीचा लाभ कशा प्रकारे मिळू शकतो याबद्‌दल त्यांनी सविस्तर माहिती दिली.

---------------------------------------

मलेरिया

आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयानुसार गडचिरोली हा देशातील मलेरियामुळे सर्वाधिक प्रभावित झालेल्या ६ जिल्ह्यांपैकी एक आहे. या जिल्ह्याला मलेरियामुक्त करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले असून यासाठी डॉ.अभय बंग यांच्या अध्यक्षतेखालील टास्क फोर्सने सादर केलेल्या जिल्हा मलेरियामुक्त करण्याच्या आराखड्याची येत्या 1 एप्रिलपासून अंमलबजावणी सुरू करण्यात येत आहे. यासाठी आदिवासी विकास विभागामार्फत 25 कोटी रुपयांची तरतूदही उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

---------------------------------------